# सातारा जिल्हा परिषद, सातारा
## ग्रामपंचायत विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जिल्हा परिषद मुख्य इमारत,चौथा मजला,सातारा -कोरेगाव रोड,सदरबझार कँप,सातारा-415001.

दूरध्वनी क्रमांक :- 02162/295043 ईमेल dyceovpsatara@gmail.com


जा.क्र. ग्रापं -04/ /कावि/ ११२९ /2025 दिनांक :-17/03/2025

प्रति,

गटविकास अधिकारी,
पंचायत समिती ................(सर्व)

विषय :- आभासी वैयक्तिक ठेव लेखा Virtual Personal Deposit Account(VPDA) या प्रणालीतून पंचायत समितींना वित्तप्रेषणद्वारे निधी वितरीत करणेबाबत.

संदर्भ- १.वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३-कोषा.प्रशा-५, दिनांक-१४.०२.२०२४

२.ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.बीजीटी-२०२४/प्र.क्र.८८/वित्त-१, दिनांक १९.०८.२०२४.

३.ग्रामविकास विभाग पत्र क्र.बीजीटी-२०२४/प्र.क्र.८८/वित्त-१ दिनांक २१.१०.२०२४

४.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सातारा यांचेकडील पत्र जा.क्र.अर्थ/अनुदान/ २९३/२०२४-२५ दिनांक २१.१०.२०२४

५.इकडील पत्र जा क्र.ग्रा.पं-०४/कावि/२१/२०२५ दिनांक ०९/०१/२०२५.

६ इकडील पत्र जा क्र.ग्रा.पं-०४/कावि/५१९/२०२५ दिनांक ०७/०२/२०२५.

७. मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, सातारा यांचेकडील निधी वितरणाबाबतचा आदेश सन २०२४-२५

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्याच्या एकत्रित देयकांद्वारे आहरित केल्या जाणाऱ्या सहाय्यक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये आभासी वैयक्तिक ठेव लेखा ही व्यवस्था व कार्यपध्दती लागू करण्यास वित्त् विभागाने मान्यता दिली आहे. तसेच संदर्भ क्र.२ वरील ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयान्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार वित्त् विभागाच्या दि. १४ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक (VPDA) प्रणालीमधुन ज्या देयकांचे अदाते अगोदरच निश्चित झालेले आहेत, अशा देयकांचे प्रदान (VPDA) प्रणालीमधुन करणेबाबत मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

त्यानुसार जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण ग्रामपंचायतींना जनसुविधा, मोठ्या ग्रामपंचायतींना नागरीसुविधा(देयकाचे ९० टक्के शासन हिस्सेप्रमाणे मागणी करावी.) अंतर्गत पंचायत समितींना जिल्हा परिषदेकडे मागणी करताना देयकांचे अदाते निश्चित झाले आहेत याची खात्री करुनच आवश्यक असेल तेवढयाच अनुदानाची मागणी करावी, तसेच मागणी केलेल्या रकमेपैकी संपुर्ण रक्कम ३ दिवसांत खर्च होईल व कोणताही निधी अखर्चित राहणार नाही, याची खातरजमा संबंधित गटविकास अधिकारी यांनी करुनच वित्तप्रेषण मागणी या कार्यालयास करावी.

वरीलप्रमाणे वित्तप्रेषणाद्वारे निधी मागणी करताना संबंधित विकास कामाचे देयके अर्थ विभागाकडूनच तपासणी करुन गटविकास अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेनंतर सदर देयकाची प्रदानास तयार असलेल्या पृष्ठाची सांक्षांकित प्रत मागणीसोबत जोडुन खालील नमुन्यात अनुदान मागणी संबंधित सहा.लेखा.अधिकारी व गटविकास अधिकारी यांची संयुक्त स्वाक्षरीने करावी याबाबत या कार्यालयाने संदर्भ क्र. ५ व ६ अन्वये आपणांस कळविणेत आले होते, तथापि बहुतांश विकास गटांकडुन मोगम मागणी केले असलेच निदर्शनास आले आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजना ग्रामपंचायतींना जनसुविधा विषेष योजना , मोठ्या ग्रामपंचायतींना नागरीसुविधा पुरविणे अंतर्गत सन २०२२-२३, २०२३-२४ व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मंजुर झालेल्या कामांना संदर्भ क्र. ७. नुसार मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, सातारा यांचेमार्फत अनुदान प्राप्त झाले आहे, सोबत सदरची यादी जोडत आहे.त्या यादीतील विकास कामे पुर्ण झाली आहेत अथवा पहिले धावते देयक आवश्यक असेल तर निधी मागणी करताना संबंधित कामाचे देयके अर्थ विभागाकडूनच तपासणी करुन गटविकास अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेनंतर सदर देयकाची प्रदानास तयार

असलेल्या पृष्ठाची सांक्षांकित प्रत मागणीसोबत जोडुन खालील नमुन्यात अनुदान मागणी संबंधित सहा.लेखाधिकारी व गटविकास अधिकारी यांची संयुक्त स्वाक्षरीने अनुदान मागणी करावी.

उपरोक्त संदर्भ क्र. ४ व ६ नुसार आवश्यक निधीची मागणी करतील त्याच विकास गटांना अनुदान वितरीत केले जाईल, तसेच ज्या विकास गटांनी परिपत्रकात नमुद केलेनुसार मागणी न केलेस तसेच संबंधित मक्तेदार यांना वेळेत देयक पारीत न झालेस याची स्वर्वस्वी जबाबदारी आपल्या विकास गटाची राहील, यांची नोंद घ्यावी. तसेच वित्तप्रेषण मागणी करताना यापुर्वी वितरीत केलेले वित्तप्रेषणामधील निधी खर्च झालेबाबतचे प्रमाणपत्र मागणीसोबत सादर करणेची दक्षता घ्यावी.

पंचायत समितीचे नाव-

योजनेचे नाव –  (रक्कम रु.लक्ष)

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता | | आवश्यक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम | दिनांक | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

**टिप- नागरीसुविधा अंतर्गत देयकाच्या ९० टक्के रक्कम शासन हिश्याची अनुज्ञेय राहील त्या अनुषंगाने देयकाचे ९० टक्के येवढेच मागणी करावे.**

वरीलप्रमाणे वित्त विभागाकडून पंचायत समितींना वित्तप्रेषणद्वारे वितरीत केलेला निधी अखर्चित राहणार नाही याकरीता सदरील कार्यपध्दतीचा काटेकोरपणे अवलंब करण्याच्या अटीवरच मान्यता दिली असले कारणाने निधी अखर्चित राहील्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित गटविकास अधिकारी यांचेवर निश्चित करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

तसेच उपरोक्त निर्देशीत सुचनांनुसार देयकासोबत चेकलिस्ट नुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता नसलेल्या देयकाची अदायगी बाबत कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सोबत- योजनानिहाय अनुदान प्राप्त यादी.

**(अर्चना वाघमळे)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**

**प्रत- १.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.**
**२.मुख्य लेखा व वित्त विभाग, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर**
**३.कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग दक्षिण/उत्तर यांना माहितीसाठी सविनय सादर**

जिल्हा वार्षिक योजना(सर्वसाधारण) ग्रामपंचायतींना जनसुविधा, मोठ्या ग्रामपंचायतींना नागरीसुविधा व क वर्ग यात्रास्थळ अंतर्गत विकास कामांचे आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA) देयकासोबत खालील नमुना दोन प्रतीत परिपुर्ण भरुन सादर करावा.

| वरील योजनांचे (VPDA) देयकासोबत सादर करावयाचे माहिती चेकलिस्ट नमुना | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपासणी करावयाची बाब | शेरा |
| १ | प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामाचे वित्तीय वर्ष | |
| २ | प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामाचे नाव | |
| ३ | प्रशासकीय मान्यता रक्कम व दिनांक(प्रशासकीय मान्यता आदेश देयकासोबत जोडावा) | प्र.मा.रक्कम<br>प्र.मा.दिनांक |
| ४ | तांत्रिक मान्यता रक्कम व दिनांक (तांत्रिक मान्यता आदेश देयकासोबत जोडावा) | तां.मा.रक्कम<br>तां.मा.दिनांक |
| ५ | कार्यारंभ आदेश मिळालेल्या मक्तेदाराचे नाव व दिनांक (कार्यारंभ आदेश देयकासोबत जोडावा) | |
| ६ | देयकाचे स्वरुप (पुर्ण/ पहिले धावते देयक) | |
| ७ | काम पुर्णत्वाचा दिनांक व दाखला जोडावा. | |
| ८ | काम हस्तांतरणाचा दाखला जोडवा. | |
| ९ | काम पुर्णत्वानंतर व हस्तांरणानंतर सदरची मालमत्ता ग्रामपंचायतींच्या अधिकार अभिलेखात नोंद केलेचा उतारा/PRB नोंदीचा उतारा. | |

वरील चेकलिस्ट नुसार देयकासोबत सादर केलेल्या सर्व बाबींची तपासणी करुन योग्य असल्याचे शाहनिशा केलेली आहे. त्यानुसार पुर्ण कामाचे देयक अथवा पहिले धावते देयक मक्तेदार यांना (VPDA) नुसार देयक अदायगी करण्यास शिफारस आहे.

गटविकास अधिकारी यांची सही/शिक्का